# गावठी पिस्टल, जीवंत काडतुसासह दोन आरोपी पोलीसांच्या ताब्यात

नांदेड / प्रतिनिधी- शहराच्या नवीन नांदेड भागात ग्रामीण पोलीस स्थानकाच्या हद्दीतील इदगाह मैदान परिसरात पाकिजानगर येथे पोलीसांनी छापा टाकून दोन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून एक गावठी पिस्टल व अकरा जीवंत काडतुसे जप्त केली असल्याची माहिती पोलीसांनी दिली.

शहरात दर दोन दिवसाआड गावठी पिस्टल सापडत आहेत. पोलीसांनी गावठी पिस्टल बाळगणाऱ्या आरोपीसाठी शोध मोहिमच सुरु केली आहे. नांदेड ग्रामीण पोलीस स्थानकातील कर्मचाऱ्यांना इदगाह मैदान परिसरात असलेल्या पाकिजानगर येथे शेख इलियास, शेख शहबाज या दोन आरोपींकडे गावठी कट्टा असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. यावरुन पोलीसांनी छापा टाकत या दोन आरोपीला ताब्यात घेवून अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे एक गावठी कट्टा व ११ जीवंत काडतुस जप्त केली आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, पोलीस निरिक्षक एन.एस.आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन गढवे, पोलीस उपनिरिक्षक महेश कोरे, पोलीस कर्मचारी प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, विक्रम वाकोडे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी केली आहे.

दै. देशोन्नती दि. 15/03/24

# गावठी पिस्तूल, ११ जिवंत काडतुसासह दोन आरोपी अटकेत



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ नांदेड ग्रामीण पोलिसांनी १३ मार्च रोजी केलेल्या कारवाईत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून एक गावठी पिस्तूल व ११ जिवंत काडतुस जप्त केले.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध पिस्तूल बाळगणाऱ्याचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्या अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत उपविभागीय

## नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोनि एन.एस.आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलिसांनी १३ मार्च रोजी ईदगाह मैदानाच्या कोपऱ्यात पाकिजानगर येथे जावुन छापा मारला असता तेथे शेख इलियास शेख इरफान (२३) रा. पाकीजानगर व शेख शहबाज शेख शकील (२४) रा. दुधडेरी रहिमपुर यांना ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्तूल व ११ जिवंत काडतुस आढळून आले असून पोलिसांनी ते जप्त करून दोघांना अटक केली. या कारवाई पथकात सपोनि. सचिन गढवे, पोउपनि महेश कोरे, प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, विक्रम वाकोडे, मारोती माने, शेख सत्तार मगदुम, मारोती पचलिंग, माधव माने, चंद्रकांत स्वामी, शिवानंद तेजबंद, शंकर माळगे, मंगेश पालेपवाड, विठ्ठल भिसे यांचा समावेश होता. याप्रकरणी सदर आरोपीविरुध्द नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल आहे.